Advertisement for newspaper

## वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

## सेवानिवृत्त विधी अधिकारी (गट-अ) यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

विभागातील विविध प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणांवर कायदेविषयक सल्ला देणे, मॅट, मा. उच्च न्यायालयीन प्रकरणी उपलब्ध अभिलेख्यांवरून परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे, न्यायालयात सादर करावयाच्या शपथपत्रांचा मसुदा तयार करणे, न्यायालय आणि विभाग यांमध्ये समन्वय साधणे, तसेच अन्य विधीविषयक कामकाज, सल्ला आणि मार्गदर्शन इत्यादी विधीविषयक कामकाज करण्याकरीता १ वर्षाच्या कालावधीसाठी - मंत्रालयीन प्रशासकीय विभागातून विधी अधिकारी (गट-अ) या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://finance.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत.

अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून ८ दिवसांत सादर करावा .


( रेखा काळसेकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

०२२-२२७९४३०२/०२२-२२७९४३०३

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-

.......................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-

.......................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-

.......................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-

.......................................................................

५) जन्म दिनांक व वय :-

.......................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) अनुभव :-

.......................................................................

विभागातील विविध प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणांवर कायदेविषयक सल्ला देणे, मॅट, मा. उच्च न्यायालयीन प्रकरणी उपलब्ध अभिलेख्यांवरून परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे, न्यायालयात सादर करावयाच्या शपथपत्रांचा मसुदा तयार करणे, न्यायालय आणि विभाग यामध्ये समन्वय साधणे, तसेच अन्य विधिविषयक कामकाज, सल्ला आणि मार्गदर्शन इत्यादी विधीविषयक कामकाज करण्याकरीता १ वर्षाच्या कालावधीसाठी - मंत्रालयीन प्रशासकीय विभागातून विधी अधिकारी (गट-अ) या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

Details on Website

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

## विधी अधिकारी हे पद करार पध्दतीने सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांमधून भरण्याबाबत

**विभागाची आवश्यकता :**

विभागातील विविध प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणांवर कायदेविषयक सल्ला देणे, मॅट, मा. उच्च न्यायालयीन प्रकरणी उपलब्ध अभिलेख्यांवरून परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे, न्यायालयात सादर करण्यासाठी शपथपत्रांचा मसुदा तयार करणे, न्यायालय आणि विभाग यांमध्ये समन्वय साधणे, तसेच अन्य विधीविषयक कामकाज, सल्ला आणि मार्गदर्शन करण्याकरिता विधी अधिकारी या एका पदावर मंत्रालयीन प्रशासकीय विभागातून विधी अधिकारी (गट-अ) या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००/ १३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

२) मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विधी अधिकारी(गट-अ) पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी असावा.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता वेबसाईट वरील माहिती पाहून adm१.fd@maharashtra.gov.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२७८४३०२/०२२-२२७९४३०३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

११) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

--x--